दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ११९ वा मंगळवार दि.१५ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# सत्ताधारी पक्षाकडून विकास कामे करण्यापेक्षा समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा सरकारवर हल्लाबोल

लातूर / प्रतिनिधी :- राज्य व केंद्र सरकारमधील लोकांनी विकासकामे न करता समाजातील तेढ कसे निर्माण होईल याकडेच सरकार प्रयत्न करत असल्याचा घणाघात राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी येथे बोलताना व्यक्त करून विकास विश्वास प्रगती करणाऱ्या कॉंग्रेसच्या पाठीमागे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत ऊभे राहून अमित देशमुख,धीरज देशमुख यांना अधिकाधिक मताधिक्य द्यावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले ते लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भातांगळी जिल्हा परीषद सर्कलस्मधील कॉंग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते यांच्याशी संवाद बैठक रविवारी घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते यावेळी व्यासपिठावर लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासरावजी देशमुख, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, जागृति शुगर चें उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, मांजरा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष धनंजय देशमुख, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शाम भोसले,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख जनार्दन वंगवाड,कॉंग्रेस तालुका अध्यक्ष सुभाष घोडके, वाल्मीक माडे, मनोज पाटील, राजेसाहेब पाटील, मधुकर पाटील,अँड श्रीरंग दाताळ, प्रताप पडिले,जब्बार सगरे, सुनील पडिले, राजकुमार पाटील अनुप शेळके,अँड प्रवीण पाटील, दगडू पडिले,सचिन दाताळ, शंकरराव बोलंगे,रघुनाथ शिंदे, हरिराम कुलकर्णी, उपस्थित होते प्रपंच विकासाच्या मुद्दे बाजूला ठेवून सरकारचे लक्ष दुसरीकडे केंद्र व राज्य सरकार एकाच विचाराचे असताना त्यांनी समाजातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न न करता ते प्रश्न तसेच झुलवत ठेवले असून कोंग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी समाजाचे आरक्षण ५० टक्क्यांहून ७० टक्के पर्यंत घेवून जाण्याची मागणी केली ती अतिशय रास्त मागणी आहे असे सांगून समाजात आर्थिक सुबत्ता, प्रगती, समानता येण्यासाठी आरक्षण आवश्यक आहे आज राज्यातील विविध समाज आपल्या हक्कासाठी सरकार दरबारी मागणी करत आहेत मात्र याकडे सरकारचे पूर्णपणे दुर्लक्ष करून समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न सुरू आहेत यापासून आपण सावध रहावे आगामी विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेस आघाडीच्या उमेदवारांना भरभरून आशीर्वाद द्यावेत असे आवाहन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केले आहे ४० वर्षापासून नेतृत्व व नाते जपले पुढेही जपणार यावेळी बोलताना माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांनी लातूर जिल्ह्यात लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांनी गेल्या ४० वर्षात या नेतृत्वाने आपले नाते जपले असून आपल्याला जो शब्द त्यांनी दिला तो पाळला का नाही? आपल्या प्रगतीमध्ये मागे कोण आहे हे वळून पाहिले पाहिजे आपले आजोबा पणजोबा वडील यांच्यासोबत आपले नाते कायम जपले आहे यापुढेही आपले नाते जपू असे सांगून गाव पातळीवरील वैयक्तिक हेवेदावे विसरून जा मोजून आपले बूथ प्लस करा आपल्या भागाचा विकास करून घेण्यासाठी लातूर शहरातून आमदार अमीत देशमुख, लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून धीरज देशमुख यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून अधिक मताधिक्य द्यावे असे आवाहन त्यांनी केले






१५०० कोटी रुपयांची विकासकामे केली आमदार धीरज देशमुख यांचे प्रतिपादन

यावेळी बोलताना लातूर ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख यांनी मागच्या पाच वर्षाच्या काळात लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात मी विरोधी पक्षातील आमदार असतानाही सरकार दरबारी प्रयत्न करून १५०० कोटी रुपयांची विकासकाने खेचून आणली असून त्यात भातांगळी जिल्हा परिषद सर्कल मध्ये १६ गावात २२९ कामे मंजूर करून तब्बल १७ कोटी रुपये विविध विकास कामासाठी निधी आणला अनेक कामे झाली तर काही कामे प्रगती पथावर असल्याचे सांगून जिल्हा बँकेच्या माध्यमातून लाडकी बहिण योजना अंतर्गत जिल्ह्यातील ३२,००० खाते उघडून महिला भगिनींना निःशुल्क सेवा दिली आहे ही आमची सामाजिक बांधिलकी म्हणून कार्य केले आहे आगामी काळात मतदारांनी कॉंग्रेसला साथ द्यावी असे आवाहन त्यांनी करून लोकांच्या प्रगतीसाठी विकासाचा वेग अधिक सुरू ठेवण्यासाठी कॉंग्रेसला अधिक मताधिक्य द्यावे असे आवाहन त्यांनी केले.

विकासाची विश्वासाची परंपरा कायम ठेवण्यासाठी कॉंग्रेसला साथ द्या माजी आमदार वैजनाथदादा शिंदे यांचे प्रतिपादन

लोकनेते विलासराव देशमुख, माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात विकासाची कामे केलेली आहेत विविध योजना राबवून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम याच मांजरा परिवाराने केले असून आपली प्रतिष्ठा कायम ठेवण्यासाठी कॉंग्रेसला साथ द्यावी आमदार धीरज देशमुख यांना पुन्हा एकदा निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी आबासाहेब पाटील,तालुका कॉंग्रेस अध्यक्ष सुभाष घोडके, श्री जनार्दन वंगवाड जब्बार सगरे, श्री हरीश बोळंगे, प्रा संदीप शिरसाट, सुशांत मुळे, कमलाकर अनंतवाड यांच्यासह यांनी यांनी विचार मांडले याप्रसंगी भातांगळी गनातील कोंग्रेसचे पदाधिकारी जितेंद्र स्वामी, संभाजी रेड्डी, सतीश पाटील, बंडू पाटील, गरड, डोके, मुळे , विर,बाजार समितीचे संचालक, मांजरा रेणा विलास साखर कारखान्याचे संचालक मंडळ विविध पदाधिकारी, कार्यकर्ते सोसायटीचे चेअरमन, सरपंच शैक्षणीक संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खेळ म्हणजे फक्त आनंद असतो - साहित्यिक उत्तम तरकसे

नवी मुंबई / के. एच. हनवते :- खारघर सेक्टर ११ देवळेश्वर मैदान येथे दसऱ्याच्या पूर्वसंध्येचा मुहूर्त साधून मंदार पाटील स्पोर्ट्स वेल्फेअर असोसिएशन खारघर च्या वतीने चाम्स क्रिकेट अकॅडमीचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याच्या समाजभूषण पुरस्कारने सन्मानित कवी साहित्यिक विचारवंत उत्तम दासू तरकसे आसरडोकर यांच्या हस्ते बॉलिंग व बॅटिंग करून उद्घाटन करून तरकसे साहेब आपले विचार मांडताना खेळ म्हणजे फक्त आनंद असतो त्यात कोणत्याही प्रकारचा भेदभाव नसतो असे मोलाचे विचार मांडत सर्व खेळाडूंना व अकॅडमीला उत्तरोत्तर प्रगती करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमास श्री हिमगिरे श्री खेडकर श्री बापू कांबळे इतर ज्येष्ठ नागरिक तसेच खेळाडूंचे शिक्षक शिकाऊ खेळाडू व त्यांचा पालक वर्ग मोठ्या संख्येने हजर होता मंदार पाटील स्पोर्ट्स अकॅडमी चे संस्थापक प्रमुख श्री मंदार पाटील यांनी उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांचे खेळाचे शिक्षक व शिकाऊ खेळाडू व त्यांचे पालक वर्ग हे सर्वांचे आभार मानले






## माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या हस्तेप्रभाग ९ मधील विविध विकास कामांचे भूमिपूजन

लातूर / प्रतिनीधी :- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते सोमवार दि. १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ९ मधील हॉटेल शिवनेरी ते कावेरी हॉस्पिटल रस्त्याचे डांबरीकरण व श्री एजन्सी ते पडिले घरापर्यंतच्या सिमेंट रस्त्यांचे कॉंक्रिटीकरणासह विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, माजी नगरसेवक अशोक गोविंदपुरकर, व्हा. चेअरमन विजय देशमुख, माजी नगरसेविका सपना किसवे, माजी नगरसेविका रिहाना बासले, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती




सुनील पडिले, अमर राजपूत, चांदपाशा इनामदार, हारून बासले, मनपा अधिकारी बंडू किसवे, सुमुख गोविंदपुरकर, कुणाल वागज, आतीक बासले आदीसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते

# विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सर्वांना शांतीचा मार्ग दाखवला - क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

## भविष्यात विश्वशांती हे बुद्ध विहार एक संस्कार केंद्र म्हणून ओळखले जाईल







उदगीर / प्रतिनिधी :- १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दीक्षाभूमी , नागपूर येथे विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारून आपल्या सर्वांच्या जीवनाला दिशा दिली. आज आपली जी प्रगती आहे ती महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली देणगी असून आपण आयुष्य जगत असताना विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपणास बुध्दांचा शांतीचा मार्ग दाखवला असुन आपण सर्वांनी त्यांच्या तत्वांचे अनुकरण करून आपण आपले जीवन सुखी करावे असे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहरातील तळवेस येथे उभारण्यात आलेल्या विश्वशांती बुद्ध विहारात धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित महाबुद्ध वंदने नंतर समाज बांधवांना संबोधित करत होते. यावेळी भंन्ते नागसेन बोधी, भिक्कु संघ , समाजातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. पुढे बोलताना नामदार संजय बनसोडे यांनी, आपल्या सर्वांचा एक महत्त्वाचा सण म्हणजे, धम्मचक्र प्रवर्तन दिन आहे. दरवर्षी भीम अनुयायी हा सण विजयादशमी दिवशी साजरा करतात. भारतात 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' हा साजरा केला जाणारा महत्वाचा उत्सव आहे. महाराष्ट्रासह देशभरातील लाखो अनुयायी या दिवशी नागपूरला येतात. मात्र समाज बांधवांच्या मागणीचा विचार करून आपण विश्वशांती बुद्ध विहाराची निर्मिती केली. गुलबर्गा येथील बुद्ध विहाराप्रमाणे उदगीर शहरातील तळवेस येथे भव्य बुध्द विहार उभारुन या विहाराचे लोकार्पण महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते केले. आपल्या समाजामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आचार, विचार आपल्या पुढच्या पिढीमध्ये रुजावे म्हणून या विहाराची निर्मिती केली असून आपल्या येणाऱ्या प्रत्येक पिढीला हे विहार प्रेरणा देईल. भविष्यात विश्वशांती हे बुद्ध विहार एक संस्कार केंद्र म्हणून ओळखले जावे असा विश्वास ना.बनसोडे यांनी व्यक्त केला. प्रारंभी ना. बनसोडे तथागत भगवान बुध्द आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले समाज बांधव हजारोंच्या संख्येने विश्वशांती बुद्ध विहार परिसरात उपस्थित होते.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# संयुक्त राष्ट्र संघटनेचे भवितव्य गंभीर वळणावर

न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्र या संघटनेचे भलेमोठे दिमाखदार संकुल डौलाने उभे आहे; पण बदलत्या भू-राजकीय वातावरणात या आंतरराष्ट्रीय संस्थेचा धाक जगातील देशांना कितपत उरला आहे, याची शंका येते. जगाच्या भवितव्यावर विचारमंथन करण्यासाठी अलीकडेच झालेल्या शिखर परिषदेच्या निमित्ताने या संघटनेच्या भवितव्याबद्दलही गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले. 'ग्लोबल साऊथ'चे नेतृत्व करणारा भारतासारखा देश तसेच आफ्रिकन देश यांना या संघटनेच्या सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी सदस्यत्व देऊन ही संस्था अधिक प्रातिनिधिक आणि लोकशाहीवादी करणे हे अग्रक्रमाचे आहे. संयुक्त राष्ट्रे ही आंतरराष्ट्रीय संघटना २०२५ मध्ये ८० व्या वर्षात पदार्पण करीत असताना २०२२-२३ सप्टेंबरच्या आठवडाभराच्या वार्षिक आमसभेच्या निमिताने जगाच्या भवितव्यावर विचारमंथन करण्यासाठी 'द यूएन समिट ऑफ द फ्युचर'चे आयोजन करणे औचित्यपूर्ण ठरले होते; पण याच वेळी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या भवितव्याचे काय, हा प्रश्न ऐरणीवर येणे हेसुद्धा अपरिहार्य म्हणावे लागेल. रशिया-युक्रेन युद्ध, युक्रेनच्या पाठीशी असलेल्या नाटो संघटनेतील देशांचा त्यातील वाढता सहभाग, इस्रायल-हमास युद्धात हिजबुल्ला या दहशतवादी संघटनेने घेतलेली उडी आणि त्यात आता या दहशतवादी संघटनेला पोसणार्या इराणने इस्रायलमध्ये मोठ्या प्रमाणावर क्षेपणास्त्रे डागून या देशाला दिलेले आव्हान, त्यामुळे मध्य पूर्वेचा हा प्रदेश तिसर्या महायुद्धाची नांदी तर ठरणार नाही ना, या शंकेचे जगावरील सावट अशी भीषण परिस्थिती उद्भवली आहे. या बिकट अवस्थेत शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी स्थापन झालेली संयुक्त राष्ट्र ही संघटना किती निष्प्रभ होत आहे, हे कटू वास्तव आता उघड झाले. जगातील भू-राजकीय स्थिती झपाट्याने बदलत चालली असताना ही संघटना मात्र बदलत नाही, याविषयी चिंता वाटणे म्हणूनच स्वाभाविक आहे. या संघटनेचा धाक उरला नसल्याने बिनदिक्कतपणे सर्रास आंतरराष्ट्रीय कायदे धाब्यावर बसविले जात आहेत. संयुक्त राष्ट्रे असोत, जागतिक व्यापार संघटना असो वा आंतरराष्ट्रीय नाणे निधी वा जागतिक बँक असो, या संस्थांबाबत जे प्रश्न निर्माण झाले आहेत, त्यातील बहुसंख्य प्रश्नांचे मूळ त्यांनी १९४५ नंतरच्या संरचनेतील बदलांचा विचार फारसा केलेला दिसत नाही याच्यात दडलेले आहे. त्यामुळे बहुपक्षीय रचनेचा आग्रह भारत धरत असून, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत परिवर्तन झाले पाहिजे, अशी आग्रही भूमिका आग्रहाने मांडत आहे. 'ग्लोबल साऊथ'ला, विशेषतः भारत आणि अफ्रिकन देशांना कायमस्वरूपी प्रतिनिधित्व मिळाल्याखेरीज संघर्ष आणि पेचप्रसंग सुटणे अवघडच होणार आहे. आपल्या देशाशी विचारविनिमय न करता महत्त्वाच्या प्रश्नांवर निर्णय घेतला तर सुरक्षा परिषदेच्या ठरावाचे उल्लंघन करण्याचा पवित्रा भारत घेऊ शकतो. तसे झाले तर या दबावाचा लाभ होऊ शकतो, असे या परिषदेचे दोन खेपेस अध्यक्ष असलेले किशोर महबुबानी यांनी सुचविले आहे. संयुक्त राष्ट्रांचे सेक्रेटरी जनरल अँटोनियो गुटारेस यांनी जे वक्तव्य केले, ते जगाचे तसेच या संघटनेच्या भवितव्याविषयीचे मार्मिक भाष्य म्हणावे लागेल. 'आपल्या आजोबांनी निर्माण केलेल्या व्यवस्थेच्या आधारे आपल्या नातवांचे भविष्य घडविता येणार नाही,' असे ते म्हणतात. सॅनफ्रान्सिस्को येथे ४९ सदस्य देशांना बरोबर घेऊन या संस्थेची निर्मिती झाली. आता पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. आजचे भू-राजकीय तणाव आणि युद्धे टोकाला गेल्याचे दिसते. ही स्थिती हाताळण्यात ही संघटना अपयशी ठरत असताना तरी त्याच्यात बदल करण्याबाबत आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. यावेळी त्याची छोटीशी सुरुवात झाली, ही त्यातल्या त्यात जमेची दिलासादायक बाजू. संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत आफ्रिकन देशांसाठी कायमस्वरूपी सदस्यपदासाठी दोन जागा देण्यास अमेरिकेने पावले उचलण्याची हमी दिलेली आहे. याखेरीज भारत, जपान आणि जर्मनी या देशांनाही कायमस्वरूपी सदस्य म्हणून सामावून घेण्याबाबत पाठपुरावा करण्याची तयारीही या देशाने दाखविली आहे. एकविसाव्या शतकात चित्र बदलले असून, या बड्या देशांची दादागिरी आणि वर्चस्व अनेक देशांना अमान्य आहे, म्हणूनच त्याच्या पुनर्रचनेचा रेटा कायम आहे. भारत विकसनशील देशांचा आवाज म्हणून पुढे येत असल्याचे चित्र आहे; पण भारताला जागतिक वातावरणात अधिक शक्तिशाली होऊ देणे हे अमेरिकेसह पाच कायम सदस्य देशांना नको असावे. त्यांचे निर्णय प्रक्रियेतील वर्चस्व आणि नियंत्रण त्यांना गमवायचे नाही. शिवाय भारताने मागणी केली तर नव्याने येऊ पाहणारे देशही अशीच मागणी करण्याची शक्यता त्यांनी गृहीत धरली आहे. नकाराधिकार अधिकाधिक सदस्यांना देण्याने निर्णय प्रक्रियेत गुंतागुंत वाढून जागतिक पेचप्रसंग सोडविण्यात अधिक अडथळे येण्याची भीती हे देश दाखवत आहेत. राजकीय वैमनस्यामुळे चीन आणि पाकिस्तानचाही भारताला असा अधिकार देण्यास विरोध आहे. एकूणच जागतिक सत्तासंतुलन बिघडू नये यासाठी चाललेला हा आटापिटा आहे. याचा अर्थ यापुढेही भारताला आपले योग्य स्थान मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागणार आहे. सुदैवाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका भेटीने चित्र बरेच बदलले आहे. भारत जागतिक पातळीवर नेतृत्व करण्यास सक्षम असल्याचे यावेळी जागतिक नेत्यांनी पाहिले.

# सुक्ष्मवृतीने अक्षर शोधण्याची कला यांच्याच ठायी !

दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'जागतिक अंध दिन' किंवा 'पांढरी काठी सुरक्षा दिन' म्हणून साजरा केला जातो, हा एक जागतिक कार्यक्रम आहे ज्याचा उद्देश अंधत्व आणि दृष्टीदोषाकडे लक्ष वेधण्यासाठी आहे. तुम्ही रस्ता ओलांडताना, चालताना संपूर्ण पांढर्या रंगाची किंवा वरून दोन तृतींयांश पांढरा आणि खाली एक तृतीयांश लाल रंग असलेली काठी घेऊन चालणारे अनेक लोक पाहिले असतील. हे सर्व लोक देसी डोळे परी निर्मिसी त्यापुढे अंधार अशी निसर्गाची अजब निर्मिती असलेले अर्थात अंध असतात. या दिवशी नॅब (नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड) या संस्थेच्या वतीने दरवर्षी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. ऑक्टोबरचा दुसरा गुरुवार हा जागतिक दृष्टी दिन आहे, आपले डोळे आणि दृष्टी सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित करण्याची, दृष्टीदोष आणि अंधत्वाबद्दल जागरुकता वाढवण्याची आणि नेत्र आणि दृष्टी काळजीला प्रोत्साहन देण्याची संधी.

२००० पासून जागतिक दृष्टी दिन साजरा केला जात आहे आणि आता जागतिक आरोग्य संघटनेच्या बरोबरीने अंधत्व प्रतिबंधक आंतरराष्ट्रीय एजन्सीद्वारे समन्वयित केले जात आहे. हे सुरुवातीला लायन्स क्लब इंटरनॅशनल फाऊंडेशनच्या साइटफर्स्ट मोहिमेचा भाग म्हणून पाळण्यात आले. या दिवशी नेत्र तपासणी किंवा तुमच्या डोळ्यांची काळजी घेण्याचे वचन द्या आणि इतरांना तसे करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी सोशल मीडियावर शेअर करा. या जागतिक दृष्टी दिनाचे आंतरराष्ट्रीय अंधत्व प्रतिबंधक संस्था (आयएपीबी) चे उद्दिष्ट १० दशलक्ष डोळ्यांच्या चाचण्यांपर्यंत पोहोचणे हे आहे आणि नेत्र निगा सेवांसाठी जागरुकता निर्माण करण्याचे वचन दिले आहे. या वर्षी २०२४ मधील जागतिक आरोग्य दिनाची थीम 'माय हेल्थ, माय राइट' अशी आहे आणि आम्ही अधिक सहमत होऊ शकलो नाही. आरोग्य सेवा मिळणे हा मूलभूत मानवी हक्क आहे.

चढउतार, दगडधोंडे, खाचखळगे, कुत्रे, मांजर असे प्राणी, बसलेली-झोपलेली माणसे असे काठीच्या परीक्षेत्रात येणारे सगळेच अडथळे पांढर्या काठीचा उपयोग करून पार करता येतात. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पहिल्या महायुद्धानंतर डॉ. रिचर्ड व्हुव्हर यांनी सर्वप्रथम अंधांना चालण्या-फिरण्यासाठी सोयीची पडेल अशी विशिष्ठ स्वरूपाची काठी तयार केली. ती काठी हुव्हर केन म्हणून ओळखली गेली. १९२१ मध्ये ब्रिस्टलचे फोटोग्राफर जेम्स विंग्ज यांना अपघातात अंधत्व आले. तेव्हा गडद रंगांच्या काठया घेऊन फिरताना वाहनचालक आणि इतर डोळस व्यक्तींना दुरून ती ओळखणे कठीण जात होते. हे लक्षात आल्यानंतर अंधारातही सहजपणे दिसेल, असा पांढरा रंग आपल्या काठीला दिला. डोळा असूनही नसल्यासारखा असतो. पांढरी काठी आम्हांस जणू आमचा डोळाच. कुणाच्याही आधाराशिवाय मुक्तपणे संचार करण्यासाठीचा आत्मविश्वास. ही पांढरी काठी म्हणजे अंधाची आजची जीवन संजीवनी व जीवनसाथी आहे. जागतिक पांढरी काठी दिनानिमित्त लोकांनी अंधांना रस्ता ओलांडताना मदत करणे, साहित्य पुरवून यामध्ये जनजागृती करावी. यामध्ये लोकसहभाग खूप आवश्यक आहे. अंधासाठी पांढरीकाठी म्हणजे त्यांच्या करिता जीवनरेखाच आहे.

तुम्हा-आम्हाला डोळे आहेत, चांगली दृष्टी आहे. त्याद्वारे आपण साऱ्या सृष्टीसौंदर्याचा आस्वाद घेऊ शकतो. मनमुराद आनंद लुटू शकतो. पण ज्यांना डोळे नाहीत, दृष्टी नाही, त्यांचा कधी आपण विचार केला आहे का? तात्पर्य म्हणजे त्यांचा देखील आपण सामाजिक कर्तव्यबुद्धीने विचार करायला हवा. कारण तेही समाजाचे अविभाज्य घटक आहेत. दृष्टिहीन लोकांना आपल्या सारखंच जग न्याहाळता यावं आणि त्यांनाही डोळसपणे जीवनदर्शन करता यावं व त्यांना एक नवी जीवनदृष्टी मिळावी, या दृष्टिकोनातून आपण सर्वजण 'नेत्रदान' करण्याचा संकल्प करू या. दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक अंध दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. पांढरी काठी घेऊन रस्त्यावर चालणारी व्यक्ती ही अंध आहे याचं सामाजिक भान ठेवून त्याला मदतीचा हात देणं, हा एक कर्तव्याचा भाग आहे, हे लक्षात ठेवावे. जागतिक पातळीवर दृष्टिहीन लोकांची संख्या पाहता, त्यातील २० टक्के लोक एकट्या भारतात आहेत. अशा गंभीर जागतिक प्रश्नावर रामबाण उपाय म्हणजे प्रत्येक सुजाण नागरिकाने नेत्रदान करण्यास स्वयंस्फुर्तीने पुढे येणं व ही काळाची गरज देखील आहे. जगात सुमारे १८० दशलक्ष लोक दृष्टिहीन असून, त्यातील जवळ जवळ ३५ दशलक्ष लोक भारतात आहेत. जगातील सुमारे ९० टक्के अंध हे विकसनशील देशांमध्ये राहणारे आहेत. वार्धक्य, बदलती जीवनशैली, गरिबी, निरक्षरता, मानवी विकासाचा अभाव, सामाजिक मागासलेपणा, अत्याधुनिक वैद्यकीय साधन सामुग्रीची कमतरता या प्रमुख गोष्टी अंधत्वाच्या वाढत्या प्रमाणाला कारणीभूत आहेत, असे जागतिक आरोग्य संघटनेच्या सर्वेक्षणात नमूद केलं आहे. जागतिक पातळीवर 'अंधत्व' या समस्येवर मात करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय अंधत्व प्रतिबंधक संस्था (आयएपीबी) आणि जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्युएचओ) यांनी संयुक्तपणे '२०२० व्हीजन' हा कार्यक्रम राबवून, प्रत्येकाला 'दृष्टीचा अधिकार' ही संकल्पना साकार करण्यात पुढाकार घेतला आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी भारतासह ४० देशांनी योगदान देण्याची तयारी दर्शविली, ही उल्लेखनीय बाब आहे. खरं तर, भारताच्या खालोखाल दक्षिण आफ्रिका व चीन या देशद्वयामध्येही अंधत्वाची समस्या लक्षणीय आहे. वैश्विक स्तरावर जनजागृती करून अंधत्वाच्या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी प्रभावी व ठोस उपाययोजना केल्या जात आहेत. जगातील लहानमोठ्या सर्वच देशांनी वैश्विक कर्तव्य या नात्याने या मोहिमेला यशस्वी करण्यात कटिबद्ध व्हावे, हे अपेक्षित आहे. प्रत्येक नेत्रहीन व्यक्तीला राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्याच्या मनातील अंध म्हणून न्युनगंडाची भावना घालविण्यासाठी प्रत्येकाने सामाजिक बांधिलकीच्या नात्याने प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य सरकारनेही नेत्रचिकित्सा व कॅटरॅक्टसवर अद्ययावत उपचारपद्धती या बाबींवर भरीव आर्थिक तरतूद करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना नवी दृष्टी देण्यासाठी ठोस पावलं उचलावीत. शासनयंत्रणेने अंधत्व मिटविण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास अंधत्व निर्मूलन अभियान मोठ्या प्रमाणात यशस्वी होऊ शकते, असे जागतिक आरोग्य संघटनेचे मत आहे.

अंधांसाठी प्रत्येकाने सहानुभूतीपेक्षा स्वानुभूतीची भूमिका अवलंबिली पाहिजे. स्वत:चे डोळे पट्टीने बांधून काही वेळ जगायची अनुभूती घ्यावी, म्हणजे त्यातील गांभीर्य कळून येईल. अंध, अपंग, मतिमंद वा मूकबधिरांना गुणदोषांसह स्वीकारून त्यांना आपलसं करणं यातच मानवी जीवनाची सार्थकता आहे. अंधांना सामाजिक जाणिवेतून रस्ता ओलांडताना मदत करणे, रेल्वे-बसमध्ये बसण्यास आपली जागा देणे, त्यांच्याशी मनमोकळेपणाने संवाद साधणे, जीवनाशी निगडीत विभिन्न विषयांवर त्यांच्याशी गप्पा मारणे, त्यांचे मनोबल वाढविणे या गोष्टी आपण दैनंदिन जीवनात वावरताना करायला पाहिजेत. इतकेच नव्हे तर, एक पाऊल पुढे टाकून एखाद्या अंध व्यक्तीशी डोळस व्यक्तीचा विवाह करून देऊन त्याचे अंधकारमय जीवन प्रकाशमय करणं हे पुण्यकर्म आपण आपल्या जीवनात करू शकतो. आजच्या घडीला अंधत्वाची समस्या मिटविण्यासाठी नेत्रदान ही मोहीम लोक चळवळ होणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण मानव म्हणून जीवंतपणी अनेकप्रकारे पुण्यकर्म करीत असतो, हे कौतुकास्पद आहे. तथापि, मृत्यूनंतरही नेत्रदान करून आपण आणखी एका पुण्यकर्मात भर टाकू शकतो. म्हणून ही संधी दवडू नका, यासाठी नेत्रदानाकरिता आधीच इच्छापत्र भरून द्या, जेणेकरून आपल्या मृत्यूनंतर आपली नेत्रं दुसऱ्या अंधव्यक्तीला दान देऊन त्याला नवीन दृष्टी देता येईल. चला तर, नेत्रदान करून अंधत्वाची समस्या मिटविण्यास वचनबद्ध होऊ या.

नियतीने डोळ्यातल्या प्रकाश ज्योती हिरावून घेत ज्या अंध बांधवांचे आयुष्य अंधकारमय करून टाकले आहे, त्यांच्या जीवनात यंदाची दिवाळी आशेचा किरण आणेल अशी आपण सर्व प्रार्थना करू या!

**********

प्रवीण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# नक्षली समस्येचे समूळ उच्चाटन?

नक्षलवादाच्या समस्येचे समूळ उच्चाटन करण्यासाठी, या गटांच्या हिंसक हल्ल्यांना तोंड देण्याबरोबरच, लोकांच्या कल्याणासाठी धोरणात्मक आणि तळागाळाच्या पातळीवर ठोस पुढाकार घेण्याची गरज आहे. भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोरील सर्वांत मोठे आव्हान म्हणून नक्षलवादाचा उल्लेख केला जातो. महाराष्ट्र, छत्तीसगड, मध्य प्रदेश यांसह देशातील अनेक राज्यांमध्ये नक्षलवादी हिंसाचारात आजवर असंख्य सुरक्षा दलांचा आणि नागरिकांचा मृत्यू झाला आहे. छत्तीसगडमधील बस्तर भागात नक्षलवादी बंडखोरांविरुद्ध सुरक्षा दलांची कारवाई बर्याच दिवसांपासून सुरू आहे, मात्र थोड्या-थोड्या अंतराने घातपात आणि जवानांच्या मृत्यूच्या घटना घडत आहेत. यादरम्यान सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणात नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे किंवा त्यांना कायद्याच्या कचाट्यात आणले आहे. अलीकडेच, अबुझमदच्या थुलाथुली गावाच्या जंगलात झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकाने ३० हून अधिक नक्षलवाद्यांना ठार केले. नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार सुरू केला होता, त्यानंतर त्यांच्यावर प्रत्युत्तराची कारवाई करण्यात आली. यानंतर घटनास्थळावरून एके-४७ रायफल्ससह



घातक शस्त्रांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. यापूर्वी एप्रिलमध्ये झालेल्या चकमकीत २९ नक्षलवादी ठार झाले होते. गेल्या काही महिन्यांत सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणात माओवाद्यांचे हल्ले हाणून पाडले आहे. गेल्या वर्षभरात नक्षलवादाशी संबंधित हिंसाचाराच्या घटना १६,४६३ वरून ७,७०० पर्यंत कमी झाल्या आहेत. पुढील वर्षी ही संख्या आणखी कमी करण्याचा सरकारचा मानस आहे. नागरिक आणि सुरक्षा दलांच्या मृत्यूमध्ये सुमारे ७० टक्के घट झाली आहे. हिंसाचाराची तक्रार करणार्या जिल्ह्यांची संख्या ९६ वरून ४२ वर घसरली आहे. हिंसाचाराची तक्रार करणार्या पोलीस ठाण्यांची संख्या ४६५ वरून १७१ वर आली आहे, त्यापैकी ५० पोलीस ठाणी नवीन आहेत, म्हणजे फक्त १२० पोलीस ठाण्यांमध्ये हिंसाचाराची नोंद होत आहे. केंद्र आणि राज्यांच्या संयुक्त प्रयत्नांचे हे फळ आहे. आता नक्षलवाद्यांच्या विरोधात गृह मंत्रालय राज्यांसोबत एक मोठी योजना तयार करत आहे. नक्षलवाद्यांना रोखण्यासाठी मोठा ॲक्शन प्लॅन तयार करण्यात येत आहे. केंद्र सरकारच्या अहवालानुसार २०१० च्या तुलनेत २०२३ पर्यंत देशात नक्षली हिंसाचारात ७२ टक्के आणि मृत्यूंमध्ये ८६ टक्के घट झाली आहे. केंद्र आणि राज्य सरकारे असे दावे प्रदीर्घ काळापासून करत आहेत, परंतु वास्तव हे आहे की विविध उपाययोजना, रणनीती आणि प्रयत्न करूनही तेथील माओवादी हिंसाचारावर नियंत्रण मिळवणे कठीण ठरत आहे. वेळोवेळी नक्षलवादी सक्रिय होऊन सुरक्षा दलांवर हल्ले करतात, हे वास्तव आहे. खरोखरच नक्षलवादी काही भागांपुरते मर्यादित राहिले असते आणि त्यांच्या संघटना कमकुवत झाल्या असत्या, तर त्यांच्याकडे अत्याधुनिक शस्त्रे उपलब्ध झाली नसती आणि लष्कराच्या कारवायांवर लक्ष ठेवण्यासाठी त्यांच्याकडे प्रभावी संपर्क यंत्रणा नसती. छत्तीसगडमध्ये जवळपास चाळीस वर्षांपासून माओवाद्यांचा हिंसाचार सुरू आहे. दरम्यान, अनेक रणनीती अवलंबल्या गेल्या, पण त्या प्रभावी ठरल्या नाहीत. सुरक्षा दलांना मिळालेल्या ताज्या यशामुळे नक्षलवाद्यांचे मनोधैर्य नक्कीच खच्ची होईल, पण ही समस्या मुळापासून उखडून टाकण्यासाठी व्यावहारिक पावले उचलण्याची अजूनही आशा आहे. वास्तविक, आदिवासी भागात माओवाद्यांच्या हिंसाचाराचे अनेक पदर आहेत. सरकारला त्यांची जंगले आणि जमीन हिसकावून उद्योगपतींच्या ताब्यात द्यायची आहे, असे आदिवासींना वाटते. त्यांनी याला विरोध केला आहे. सुरुवातीला चर्चेच्या माध्यमातून हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्यातून कोणताही निष्कर्ष निघू शकला नाही. त्यानंतर बंदुकीच्या सहाय्याने त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न सुरू झाले. खूप रक्तपात झाला, पण नक्षल समस्या संपवणे शक्य झाले नाही. हेलिकॉप्टर, ड्रोन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नक्षलींच्या हालचालींवर नजर ठेवण्यात आली, पण त्यातही फारसे यश मिळू शकले नाही. नक्षलवादी अनेक वेळा सुरक्षा दलांना आपल्या जाळ्यात अडकवून त्यांच्यावर हल्ले करताना दिसले आहेत. काही वर्षांपूर्वी त्यांनी विजापूरमध्ये अशाच पद्धतीने २२ सुरक्षा जवानांची हत्या केली होती. नक्षलवादी समस्येवर मात करण्यासाठी दोन प्रकारच्या संकल्पना कार्यरत आहेत. एक म्हणजे आदिवासींना मुख्य प्रवाहाशी जोडण्यासाठी त्यांच्या भागात विकास कार्यक्रमांवर भर देण्याची शिफारस करण्यात आली आहे. या अंतर्गत मागील सरकारनेही अनेक योजना सुरू केल्या होत्या, जेणेकरून त्यांची आर्थिक स्थिती मजबूत होईल. दुसरी कल्पना म्हणजे बंदुकीच्या जोरावर नक्षलवाद्यांचा खात्मा करणे. मात्र आजपर्यंत त्यांना सामोरे जाण्यासाठी कोणतेही व्यावहारिक धोरण आखलेले नाही, हे वास्तव आहे. आज हजारो निरपराध आदिवासी तुरुंगात आहेत, त्यांच्या सुटकेसाठी कोणतीही पावले उचलली जात नाहीत. पाच-सहा वर्षांपूर्वी याबाबत धोरण ठरवण्यावर भर देण्यात आला होता, त्यात त्यांच्याशी चर्चा करण्याचाही प्रस्ताव होता, पण ते धोरण होऊ शकले नाही. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्थानिक आदिवासींमध्ये सरकार त्यांचे जीवन सुधारण्यासाठी कटिबद्ध आहे, हा विश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. त्यांच्या जल, जंगल आणि जमिनीच्या प्रश्नांवर गांभीर्याने चर्चा झाली, तर कदाचित ते हिंसेचा मार्ग सोडण्यास तयार होतील. अबुझमदच्या जंगलात झालेल्या ताज्या चकमकीचा एक पैलू म्हणजे घटनास्थळावरून घातक शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. माओवादी गटांकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात प्राणघातक शस्त्रे असणे आश्चर्यकारक नसले तरी प्रश्न असा आहे की, छत्तीसगडमधील वनक्षेत्राबाहेर पाळत आणि सुरक्षा कडेकोट बंदोबस्त असताना माओवादी गटांकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात घातक शस्त्रे कशी पोहोचताहेत? सुरक्षा दलांच्या विशेष दलांनी नक्षलवाद्यांच्या हल्ल्यांना यशस्वीपणे तोंड दिले आहे आणि त्यांना कमकुवत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु नक्षलवादाच्या समस्येचे समूळ उच्चाटन करण्यासाठी, या गटांच्या हिंसक हल्ल्यांना तोंड देण्याबरोबरच, लोकांच्या कल्याणासाठी धोरणात्मक ठोस पुढाकार घेण्याची गरज आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. मध्यंतरी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या छत्तीसगड दौर्यात मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद संपविणार, असे वक्तव्य केले होते. त्यानंतर ४ ऑक्टोबरची ताजी चकमक घडली असून नारायणपूर-दंतेवाडा या जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागात ३० हून अधिक नक्षलवादी मारले गेले आहेत. गेल्या काही वर्षांतील ही मोठी चकमक समजली जात आहे. सद्यःस्थितीत छत्तीसगडमधील बस्तर विभागात नक्षलवाद्यांचा मोठ्या प्रमाणात वावर आहे. मात्र, पोलीस कारवायांमुळे आता तोही कमी झाल्याचे चित्र आहे.

# कार्यसम्राट आमदार कालिदास कोळंबकर यांच्या शुभहस्ते बुद्धविहाराचे भूमिपूजन

मुंबई :- बौद्धजन पंचायत समिती शिवडी विभाग गटक्रमांक १३ अंतर्गत येणाऱ्या आदर्श शाखा क्र. २३८, ३१० यांच्या संयुक्त विद्यमाने ६८ व्या धर्मचक्र अनुवर्तन दिनानिमित्त बुद्धविहार भूमिपूजन उदघाटन सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडांगण, शिवडी येथे आयोजित करण्यात आला होता. सदर बुद्धविहाराचे भूमिपूजन विभागातील कार्यसम्राट आमदार कालिदास कोळंबकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले, सदर प्रसंगी दोन्ही शाखांचे मान्यवर पदाधिकारी, सभासद, महिला मंडळ, ममता गृहनिर्माण हौसिंग सोसायटीची कमिटी व रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर प्रसंगी शाखा अध्यक्ष रमेश मोरे यांनी कोळंबकर यांनी विधानसभा क्षेत्रातील भीमज्योत चैत्यभूमी, दादर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडांगण ते ममता सोसायटी इथवर आंबेडकरी विचारसरणीला अनुसरून केलेल्या कार्याचा आढावा घेऊन कालिदास कोळंबकर यांचे आभार व्यक्त केले व सदर बुद्धविहाराच्या प्रकल्पास कोळंबकर सर्वतोपरी सहकार्य करतील असे त्यांनी आश्वासन दिले आहे असे नमूद केले, तद्नंतर शाखा अध्यक्ष गोपी मोरे आपले विचार व्यक्त करत असता कालिदास कोळंबकर यांच्या सोबत राहिल्याने त्यांच्या बऱ्याच कामाचा मी साक्षीदार आहे, बुद्धविहाराकरता कोळंबकर साहेब सर्वतोपरी मदत करतील सोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा त्यांनी पुतळा उभारावा अशी विनंती करीत त्यांचे आभार मानले. ममता हौसिंग सोसायटीचे चिटणीस आणि माजी गटप्रमुख प्रकाश कासे यांनी देखील आपले विचार मांडून स्थानिक रहिवाशांचे प्रश्न कोळंबकर यांच्या समोर मांडले तसेच विजयादशमीच्या शुभदिनानिमित आमदार कालिदास कोळंबकर, दोन्ही शाखा व त्यांच्या पदाधिकारी, कार्यकर्ते, सभासद व उपस्थितांना शुभेच्छा दिल्या, शिवडी विभाग गटक्रमांक १३ चे गटप्रतिनिधी राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे यांनी ६८ व्या धम्मचक्र अनुवर्तन दिनाचे महत्व विशद करून सम्राट अशोक विजयादशमी, दसरा व धम्मचक्र अनुवर्तन दिन असा त्रिवेणी योग आपण साध्य करीत भूमीपूजनाचा कार्यक्रम केला ते प्रेरणादायी आहे असे संबोधित करीत उपस्थित उपासक, उपासिका, मान्यवर, पाहुणे व कार्यसम्राट आमदार कालिदास कोळंबकर साहेब यांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या.




कालिदास कोळंबकर साहेब आपल्या भाषणात बोलत असता भीमज्योत, नायगाव बीडीडी चाळीचे नामांतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर बीडीडी चाळ संकुलन, तोरणा गेट, वडाळा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे होणारे अनावरण, विभागातील विविध बुद्धविहार, विभागातील विविध न्याय आणि विधीसंगत कामे यांचा आढावा घेत पुढील सर्व कामांस अशी गती देत सर्वतोपरी सहकार्य करेल असे आश्वासन दिले सोबतच वडाळा कोरबा मिठागर येथे आठ फुटी चौथऱ्यावर आठ फुटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भव्य मूर्ती उभा करतोय त्याठिकाणी सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन केले. सोबतच ममता सोसायटीच्या कमिटी आणि प्रकाश कसे यांनी मांडलेल्या कॉर्पस फंड आणि पाण्याचा प्रश्न लवकरात लवकर सोडवू असे आश्वासन दिले, तसेच ममता सोसायटी कूपनलिकेच्या शुभारंभाचा सोसायटी चेअरमन प्रमोद लोखंडे यांच्या शुभहस्ते नारळ वाढवून त्याकामास ही गती दिली, तसेच आज बुद्धविहाराचे भूमिपूजन झाले असून दिवाळीला आपण बांधकाम सुरू करू असे जाहीर केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाखेचे चिटणीस बाळकृष्ण जाधव व कमलाकर वाणी यांनी सुमधुर आवाजात करून उपस्थितांचे मन जिंकून घेतले तसेच रमाई महिला मंडळाने धार्मिक पूजाविधीची धुरा सांभाळत गोडवाणीने पूजाविधी पूर्ण केला. सदर कार्यक्रमास ममता सोसायटीची कमिटी, रहिवासी, दोन्ही शाखांचे पदाधिकारी, सभासद, कार्यकर्ते, महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थिती लावून सदर कार्यक्रम यशस्वी पार पाडल्याबद्दल शाखा अध्यक्ष रमेश मोरे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# जनसामान्यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळावा यासाठी मी लढत राहणार - पंकजा मुंडे

### मी सांगितल्याशिवाय ऊस तोडीला जाऊ नका मतदान करूनच ऊस तोडायला जायच.



बीड सावरगाव / प्रतिनिधी :- जनसामान्यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळावा यासाठी मी लढत राहणार असल्याचे पंकजाताई मुंडेंनी भगवान भक्ती गडावरुन जमलेल्या जनसमुदायाला संनबोधित केले. सावरगाव येथील दसरा मेळाव्याला आठरापगड जातीचे समाज बांधव महाराष्ट्र राज्यातुन आले आहेत या विचार मंचावरून सर्वांसमोर नतमस्तक होते. ज्याच्या प्रचाराला मी माझा जीव धोक्यात घालून गेले होते ते माझे भाऊ आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील हे येथे आज उपस्थित आहेत. आता मतदान केल्याशिवाय ऊस तोडायला जाऊ नका रे बाबांनो! असे जमलेल्या ऊसतोड कामगारांना संबोधित केले. सर्व सामान्य माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळावा म्हणून जमिनी विका पण लेकरांना शिकवा असा संदेश भगवान बाबानी सर्व समाज बांधवांना दिला होता. परंतु आज या राज्यात काय चाललय जातीवाद एवढा वाढला आहे की ,आम्ही या जनसामान्यांचा विकास करण्यासाठी सर्वाना जे हव ते सगळ दिल आहे. एखाद्याने एखाद्याचा क्सिडंट केला तर तो क्सिडंट करणारा कोणत्या जातीचा? ज्याचा क्सीडेंट झाला आहे तो कोणत्या जातीचा? एखाद्याने एखाद्या मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला तर तो अतिप्रसंग करणारा कोणत्या जातीचा आणि जिच्यावर हा अतिप्रसंग झाला आहे ती कोणत्या जातीची हे असल्या प्रकारच राजकारण आपल्याला चालणार नाही. हे भगवान बाबांनाही चालणार नाही आणि हे खपवून घेतल जाणार नाही.पंकजा मुंडे कोणालाही घाबरत नाही असे यावेळी बोलताना स्पष्ट केले. दसरा मेळाव्यात स्व.लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांनी शेवटचे वाक्य जे म्हटले ते मला आजही आठवत आहे. मला या ठिकाणाहुन पंकजा दिसत आहे. पण या भगवान बाबांच्या मेळाव्याला आपला दसरा मेळावा. या मंचावर विराजमान माझी लाडकी बहीण प्रितम मुंडे माझा मुलगा आर्यमन आज भगवान बाबांच्या दर्शनाला आला आहे. तुझ्यापेक्षाही ही माणसे मला जास्त प्रिय आहेत. पोटच्या लेकरापेक्षा तुम्हाला जास्त जीव लावते की,नाही असे उद्गार पंकजाताई मुंडे यांनी. भगवानभक्ती गडावरून उपस्थितांना संबोधित केले. जिजाऊंच शौर्य, सावित्रीबाई फुलेनी चिखलाचे व शेणाचे गोळे अंगावर फेकले तरीही त्यांनी लेकींना शिकवल. पुण्यश्लोक ही उपाधी लागते का कुणाच्या मागे पण ही उपाधी आहिल्या देवी होळकरांच्या नावापुढे लागली आहे. ज्यांनी मंदिराचा जीर्णोधार केला त्या आहिल्यादेवीच होत्या. यावेळी मा. खा.प्रितमताई मुंडे,धनंजय मुंडे कृषी मंत्री तथा पालकमंत्री बीड, लक्ष्मण हाके ओबीसी नेते,यांचे भाषण झाले यावेळी व्यासपीठावर ह.भ.प. राधाताई सानप, माजी खासदार सुजय विखे पाटील,आमदार सुरेश धस, बाळासाहेब आजबे,मोनिकाताई राजळे, नमिताताई मुदडा, महादेव जानकर,माजी आमदार केशव दादा आंधळे, भीमराव धोंडे, मेघनाताई बोर्डीकर,कर्डीले, वाल्मिक आन्ना कराड ,व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेतून लातूर जिल्ह्यातील भाविक अयोध्या धाम तीर्थ यात्रेसाठी रवाना

### जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दाखविली हिरवी झेंडी





लातूर :- राज्यातील सर्व धर्मातील ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची, दर्शन घडविण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात लातूर जिल्ह्यातील जवळपास ८०० ज्येष्ठ नागरिक आज लातूर येथून रेल्वेने अयोध्या धाम येथे रामलल्लाच्या दर्शनासाठी रवाना झाले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून तीर्थ यात्रेला सुरुवात करण्यात आली. पालकमंत्री गिरीश महाजन यांनी तीर्थ दर्शन यात्रेला जाणाऱ्या भाविकांसा पाठविलेल्या शुभेच्छा संदेशाचे यावेळी वाचन करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, तहसीलदार सौदागर तांदळे, सहकारी संस्था सहायक निबंधक श्री. गडेकर, आयआरसीटीसीचे गुरुराज सोना यावेळी उपस्थित होते. साठ वर्षांवरील नागरिकांना विविध तीर्थक्षेत्रांचे दर्शन घडवण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरू केली आहे. लातूर जिल्ह्यातून या योजनेला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला आहे. आज या योजनेतून जवळपास ८०० भाविक अयोध्या येथे रामलल्लाच्या दर्शनासाठी जात आहेत. सहा दिवसांची ही तीर्थ दर्शन यात्रा १६ ऑक्टोबर रोजी अयोध्या येथे पोहचणार आहे. त्याठिकाणी दर्शन व एक दिवस मुक्काम करून १७ ऑक्टोबर रोजी परतीच्या प्रवासाला निघतील. या भाविकांना वातानुकुलीत रेल्वेतून प्रवास, भोजन, निवास आणि दर्शन व्यवस्था पुरविण्यात येत आहे. भाविकांच्या मदतीसाठी वैद्यकीय पथक, शासकीय कर्मचारी सोबत राहणार आहेत. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेला लातूर जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या योजनेमुळे जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थ दर्शनाची संधी मिळाली असून सर्वजण अतिशय आंनदी वातावरणात या यात्रेत सहभागी झाले आहेत. या यात्रेत सहभागी प्रत्येकाची काळजी घेतली जाणार असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. तसेच तीर्थ दर्शन यात्रेत सहभागी झालेल्या सर्वांना राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनावतीने त्यांनी शुभेच्छा दिल्या. प्रारंभी तीर्थ दर्शन यात्रेत सहभागी झालेल्या भाविकांचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. तसेच या भाविकांशी संवाद साधून त्यांच्या भावना जाणून घेतल्या. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेमुळे आपल्याला रामलल्लाच्या दर्शनाची संधी लाभल्याचा आनंद यावेळी भाविकांनी व्यक्त केला. तसेच शासनाचे व प्रशासनाचे आभार मानले. पारंपारिक वाद्यांच्या गजरात भाविकांना घेवून जाणारी रेल्वे अयोध्या धामकडे रवाना झाली.

# महिला तक्रार निवारण्याच्या शासकीय विशाखा समितीवर शेख आयेशा यांची निवड

### विशाखा समितीवर यांची झाली आहे निवड

आरोग्य विभाग अंतर्गत लैंगिक छळ प्रकरणी आलेल्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी विशाखा समिती महिला तक्रार निवारण्याचे काम करणार आहे. या समितीच्या अध्यक्षपदी कनिष्ठ प्रशासन अधिकारी श्रीमती गायकवाड एस.एम यांची निवड झाली आहे. तर सदस्य सचिव म्हणून वरिष्ठ सहाय्यक श्रीमती आगवान व्ही आर तर सदस्य म्हणून सहाय्यक आरोग्य परिचारिका श्रीमती कोकाटे, वरिष्ठ सहाय्यक श्रीमती फासे एस वि, वरिष्ठ सहाय्यक श्रीमती खाडे पी.डी, कनिष्ठ सहाय्यक श्रीमती नाईकवाडे, परिचर श्रीमती कैवाडे के यु आणि अशासकीय सदस्य म्हणून श्रीमती आयेशा शेख यांची निवड करण्यात आली आहे.



बीड / प्रतिनिधी :- आरोग्य विभाग जिल्हा परिषद बीड अंतर्गत महिलांच्या तक्रार निवारण यासाठी शासकीय विशाखा समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीवर अशासकीय सदस्य म्हणून आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्ष सामाजिक कार्यकर्त्या तथा पत्रकार शेख आयेशा यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद बीडचे डॉक्टर उल्हास गंडाळ यांनी शासन आदेशानुसार आरोग्य विभाग कार्यालय येथील कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळा संदर्भातील तक्रारींची चौकशी करण्यासाठी महिला तक्रार निवारण करण्याकरता विशाखा समिती गठीत केली आहे. सदरील शासकीय समिती ही बीडचे जिल्हाधिकारी, तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या सूचनेनुसार निश्चित करण्यात आली आहे. या समितीच्या अशासकीय सदस्य मध्ये पत्रकार तथा तथा आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा यांची निवड केली आहे. या निवडीबद्दल पत्रकार शेख आयेशा यांचे आरोग्य विभागासह सर्व क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

# चळवळीच्या उत्थानासाठी उत्पन्नाचा विसावा हिस्सा म्हणजे ५ टक्के आंबेडकराईट सर्व्हिस टॅक्स (एएसटी) प्रदान केला पाहिजे_ बी. बी. मेश्राम

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- शहरातील नवयुग कॅालनी भावसिंगपुरा येथील नवयान बुद्ध विहारात १३ ऑक्टोबर २०२४ ला सायंकाळी धर्मांतर घोषणेच्या ८९ व्या वर्धापनदिनानिमित्त फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात बोलताना प्रमुख वक्ते बी. बी. मेश्राम म्हणाले की, जे इतिहास विसरतात ते इतिहास घडवू शकत नाही याचे भान ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतिहासात मार्गदर्शन करताना ऑक्टोबर महिन्यात २६ वेगवेगळ्या विषयांवर संदेश दिले आहेत. त्या सर्व संदेशाचे मर्म समजून घेताना वर्तमानातील प्रासंगिकता तपासून पाहिली पाहिजे. जेणेकरून पुढील दिशा निश्चित करून मार्गक्रमण करता येईल. ४ आक्टोबर १९४५ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आपल्या प्रगतीसाठी देशाला मिळणा-या सत्तेमध्ये आपण भागीदार झालेच पाहिजे. या विधानाची महती लक्षात घेता जीवनाच्या सर्व क्षेत्रातील आपली भागीदारी किती आहे? हे तपासून मूल्यांकन केले पाहिजे. ऊर्वरीत भागीदारी मिळविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तसेच ४ ऑक्टोबर १९४७ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, समाजाचे विश्वासू नेते बनून योग्य मार्गदर्शन करावे. या अनुषंगाने विचार करता समाजात मार्गदर्शन करणारे विश्वासू नेते निर्माण झाले आहेत काय? याची विदारक स्थिती पहाता समाजात नेतृत्वाची निर्वात पोकळी निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. परिणामी आम्हाला या देशाची शासनकर्ती जमात व्हायचे आहे? हे स्वप्न दुरापास्त ठरत आहे. याची उणीव भरून काढण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ च्या काळात ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रट्स टू पॉलिटिक्स ची स्थापना केली होती. ते फार काळ चालले नाही. आता मात्र समग्र आंदोलन चालविण्यासाठी प्रशिक्षित कार्यकर्त्यांची नितांत आवश्यकता असल्याने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्याचे कार्य आपण प्रत्यक्षात सुरू केले आहे. यात सहभागी होऊन आपण या आंदोलनाचा कारवाँ वेगाने गतिमान करण्यासाठी सहकार्य करावे.

१३ ऑक्टोबर १९३५ ला नाशिक जिल्ह्यातील येवले मुक्कामी झालेल्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मी अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो पण हिंदू म्हणून मरणार नाही. असा निर्वाणीचा इशारा दिला होता. ज्याचे उत्स्फूर्त परिणाम समाजात उमटले. त्यानंतर तत्कालीन परिस्थितीत देशात अस्तित्वात असलेल्या जात-पात-तोडक मंडळाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लाहोर येथे संपन्न होणाऱ्या परिषदेला मार्गदर्शन करण्यासाठी पाचारण केले होते. मात्र आयोजकांत मतभेद झाल्यामुळे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपले भाषण लिखित स्वरूपात उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती. जेणेकरून जनतेला माहीतीस्तव प्रकाशित करून उपलब्ध करून दिले जाणार होते. ही विनंती मान्य करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महत्प्रयासाने प्रस्तावित भाषण उपलब्ध करून दिले. ज्यावर पूर्वग्रहदूषित आयोजकांत तीव्र मतभेद होऊन त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांना भाषणात सुधारणा करण्याचे सुचविले होते. ज्याला उत्तर देताना यात काना तर काय वेलांटी सुद्धा बदलता येणार नाही. असे डॉ. आंबेडकरांनी आयोजकांना कणखरपणे सुनावले होते. ज्यामुळे ती प्रस्तावित परिषद पुढे ढकलण्यात आली आणि ती कधी घडूनच आली नाही. म्हणून ते प्रस्तावित भाषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीचे निर्मुलन या सदराखाली पुस्तक रूपाने प्रकाशित केले. हा इतिहास लक्षात घेता आपण तशी कणखर भूमिका घेत आहोत काय? याचे विश्लेषण करून मार्गक्रमण केले पाहिजे.



समग्र आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला निर्वाणीचा इशारा अंमलात आणताना धर्मांतराचे वेळी आपल्या उत्पन्नाचा २० वा हिस्सा म्हणजे ५ टक्के प्रदान करण्याची अपील केली होती. आपण आपल्या वेळ, बुद्धी (कौशल्य), पैसा (अर्थ) इत्यादींचे समाजऋण परतफेड म्हणून खर्च करीत आहोत काय? या अनुत्तरित प्रश्नांची समर्पक उत्तरे शोधून जसे सर्व व्यवहारात जीएसटी अर्थात गुडस एंड सर्व्हिस टॅक्स भरत असू तर मग आंबेडकराईट आंदोलनाच्या उत्थानासाठी ५ टक्के एएसटी अर्थात आंबेडकराईट सर्व्हिस टॅक्स अदा करण्याची भूमिका पार पाडली पाहिजे.

अशाप्रकारे प्रमुख वक्ते बी. बी. मेश्राम यांनी विविध मुद्यावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाची अध्यक्षता कॅप्टन रमेश खरात यांनी केली. सुत्रसंचालन व आभार के. सी. गजभिये यांनी व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते आदर्शांना हार, पुष्प अर्पण करून बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमाला एड. आर. टी. खंदारे, मधुकर ठोंबरे, रमेश खरात, बी. एस. भालेराव, पंकज गजभिये, दिलीप मेश्राम, रविंद्र दाभाडे, ई. टी. खोब्रागडे, प्रदीप पाटील, प्रल्हाद मोरे, के. आर. तिनगोटे, एस. एस. दहाट, एस. घोबले, के. जी. गणवीर, अल्का गणवीर, शुभदा कांबळे, पंचशीला कांबळे इत्यादी हितचिंतक उपस्थित होते.

# मनोज दादा जरांगे पाटील यांचे विचार संबंध राज्यभर पोहोचविणार-हारुणभाई इनामदार

### दलित संघटन हे आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा करणार- नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड

नारायणगड/प्रतिनिधी :- मनोज दादा जरांगे पाटील यांचे विचार संबंध राज्यभर पोहोचविणार आहे असे हरुणभाई इनामदार यांनी म्हटले आहे तसेच दलित संघटन हे आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा करणार आहे असे नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी माध्यमाशी बोलताना स्पष्ट केले आहे. नारायण गडावरील दसरा मेळाव्याला आलेल्या सर्व मराठा,दलित,मुस्लिम समाज बांधवासह इतरही आलेल्या सर्व समाज बांधवांचे जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूनभाई इनामदार यांनी आभार व्यक्त केले. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नारायणगड येथे भव्य दिव्य असा दसरा मेळावा संपन्न झाला आहे. या दसरा मेळाव्याच्या अनुषंगाने केज विधानसभा मतदार संघातून जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुनभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी शेकडो गाड्यांच्या ताफ्या सह मराठा ,मुस्लिम दलित समाज बांधवासह इतरही समाज बांधवांना सोबत घेऊन नारायण गडावर दसरा मेळाव्यासाठी उपस्थिती लावली. यावेळी माध्यमाशी बोलताना हारुणभाई इनामदार म्हणले की, मनोज दादा जरांगे पाटील यांची यापुढे सामाजिक व राजकीय जी भूमिका राहील त्या भूमिकेशी आम्ही एकनिष्ठ राहून त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहून त्यांना साथ देण्याचे काम करू मनोज दादा जरांगे पाटील व नारायण गडाचे महंत ह. भ.प.शिवाजी महाराज यांनी दसरा मेळाव्याच्या निमित्ताने आम्हाला सेवा करण्याची जी संधी दिली त्याबद्दल त्या दोघांचेही त्यांनी आभार मानले. पुढे बोलताना इनामदार म्हणाले की, मनोज दादा जरांगे पाटील यांचे विचार संबंध राज्यभर पोहोचण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत लवकरच त्यांचे विचार घेऊन राज्यभर फिरणार असल्याचे त्यांनी बोलताना स्पष्ट केले.



यावेळी नगराध्यक्षा सौ.बनसोड बनसोड माध्यमाशी बोलताना म्हणाल्या की, मराठा समाज बांधवांच्या आरक्षणा सोबतच दलित व मुस्लिम समाज बांधवांची मनोज दादा जरांगे पाटील यांची आस्था आहे ती आस्था वैचारिक पद्धतीची आहे त्यामुळे दलित व मुस्लिम समाज एकोप्याने आम्ही मनोज दादा जरांगे पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहोत असे बोलताना त्यांनी सांगितले आहे. दसरा मेळाव्याला केज विधानसभा मतदारसंघातून आलेल्या मराठा,दलित, मुस्लिम समाज बांधवासह इतरही आलेल्या सर्व समाज बांधवांचे जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूनभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांनी आभार मानले.

# बाल संरक्षण प्रक्रियेत लातूर जिल्हा मॉडेल करु. –पोलीस अधिक्षक सोमय मुंडे यांचे प्रतिपादन.






लातूर :– पोलिस अधिक्षक कार्यालय आणि कलापंढरी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस अधिकारी व अमलदार यांच्या साठी पोक्सो कायदा क्षमता बांधणी या विषयावर एक दिवशी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदरची कार्यशाळा पोलीस अधीक्षक कार्यालय लातूर येथे पार पडली. सदर कार्यशाळेचे उद्घाटन पोलीस अधिक्षक श्री सोमय मुंडे यांनी केले तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्य बाल संरक्षण आयोगाचे सदस्य संजय सेंगर, हे उपस्थितीत होते. बाल संरक्षण यंत्रणा व बालकांवर काम करणाऱ्या सामाजिक संस्थेच्या समन्वयातून बालकांच्या संरक्षण प्रक्रियेत लातूर जिल्हा मॉडेल बनवू त्यासाठी लातूर पोलीस २४ तास मदत करण्यास तत्पर आहे असे मनोगत श्री सोमय मुंडे यांनी व्यक्त केले. यावेळी बोलताना श्री अजय देवरे अपर पोलीस अधीक्षक लातूर यांनी बालकांसंदर्भात घडलेल्या गुन्ह्यांच्या तपासात पोलीस यंत्रणेस येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय याबाबत उपस्थित यांना मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर बालकल्याण समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण देशमुख, बाल न्याय मंडळाच्या सदस्या छायाताई मलवाडे, परिविक्षाधीन पोलिस उप अधिक्षक, राजेश्री पाटील, कलापंढरीचे अध्यक्ष बी.पी. सुर्यवंशी यांची उपस्थिती होती. या नंतर राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य संजय सेंगर यांनी पोक्सो कायदा २०१२ या कायद्याची सविस्तर माहिती सांगून या मध्ये नविन झालेले बद्दल या कायद्या अंतर्गत बालकांची आलेली केस पोलीसांनी कशी हाताळावी या मध्ये पोलीसांची भुमिका काय, बाल न्याय मंडळाची भुमिका काय तसेच बालकल्याण समितीने कोणती आणि कशी भुमिका व जबाबदारी पार पाडावी, कोणत्या कलमा अंतर्गत एफ.आय.आर. दाखल करावा. तसेच अंतीम अहवाल कसा आणि किती दिवसात दाखल करावा, पोक्सो केस मधील कागदपत्रे कशी जमा करावीत आदी संदर्भात सविस्तर माहीती दिली. कार्यशाळेचे सुत्रसंचलन सविता कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कला पंढरी संस्थेच्या टिमने व पोलिस भरोसा सेल यांनी परीश्रम घेतले.

## केज तालुक्यातील उमरी गावचे भुमीपुत्र सुधाकर सोनवणे यांची ठाणे-पालघर जिल्हा मंजुर संघाच्या संचालकपदी बिनविरोध निवड.



केज/प्रतिनिधी :– केज तालुक्यातील उमरी गावचे भुमीपुत्र सुधाकर सोनवणे यांची ठाणे–पालघर जिल्हा मंजुर संघाच्या संचालकपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे त्यांचे ठिकठिकाणी स्वागत होत आहे व त्यांच्या मित्र परिवाराकडून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. केज तालुक्यातील उमरी या छोट्याशा खेडयातून स्वतःचा व कुटुंबाचा उदरनिर्वाहासाठी ठाणे जिह्यात कामासाठी गेलेल्या आणि प्रयत्नातून आणि कष्टातून आपला व्यवसाय चालू करून ठाणे जिल्हयात शासकीय कॉन्ट्रॅक्टर म्हणून यशस्वी काम करणारे सुधाकर सोनवणे यांची ठाणे–पालघर जिल्हा मजूर कामगार संघाच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल कास्ट्राईब शिक्षक कर्मचारी संघ केज तालुका मार्गदर्शक तथा त्यांचे बंधू भागवत सोनवणे व मित्र परिवार आणि गावातील सर्व नागरिकांनी अभिनंदन केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह येथे ६८ वा धम्मचक्र अनुवर्तन दिन मोठ्या उत्साहात संपन्न



मुंबई :– बौद्धजन पंचायत समिती आणि शिवडी गटक्रमांक १३, शिवडी विभाग कमिटी व विभागातील संलग्न सर्व शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ६८ वा धम्मचक्र अनुवर्तन दिन विभागाचे गटप्रमुख आदरणीय राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, भोईवाडा, परेल, मुंबई –१२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी अध्यक्ष राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे यांच्या वतीने महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून ज्योत प्रज्वलित करण्यात आली तद्नंतर संस्कार समितीचे बौद्धाचार्य संदीप गमरे, प्रवीण तांबे यांनी धार्मिक विधी सुमधुर, सुश्राव्य वाणीने पार पाडला. सदर प्रसंगी बौद्धाचार्य संदीप गमरे हे १४ ऑक्टोबर १९५६ (अशोक विजयादशमी) हा धम्मचक्र प्रवर्तन दिन की धम्मचक्र अनुवर्तन दिन? या विषयावर बोलत असता धम्मचक्र प्रवर्तन व धम्मचक्र अनुवर्तन म्हणजे काय हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. धम्मचक्र प्रवर्तन म्हणजे नवीन धम्माची स्थापना करून त्या धम्माचा उपदेश जनतेला करणे व सदर धम्माचा प्रचार आणि प्रसार करणे व धम्मचक्र अनुवर्तन म्हणजे अस्तित्वात असलेल्या धम्माचे अनुकरण, अनुसरण म्हणजेच स्विकार करून त्या धम्माचा प्रचार आणि प्रसार करणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे धम्मचक्र प्रवर्तन हे केवळ तथागत सम्यक संबुद्धच करू शकतात, अन्य कोणीही बोधिसत्व किंवा अर्हत पश्चेक बुध्द धम्मचक्र प्रवर्तन करु शकत नाही. बोधिसत्व सिद्धार्थ गौतमाला वयाच्या ३५ व्या वर्षी बुद्धगयेला वैशाख पौर्णिमेला पिंपळाच्या झाडाखाली (बोधिवृक्षाखाली) सम्यक संबोधी प्राप्त झाली व ते तथागत सम्यक संबुद्ध झाले व तथागत भगवान गौतम बुद्धांनी आषाढी पौर्णिमेला पाच परिव्राजकांना बौद्ध धम्माची दिक्षा देऊन बौद्ध धम्माची स्थापना केली अशाप्रकारे आषाढी पौर्णिमा हा दिवस धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून साजरा केला जातो. आजही महाराष्ट्र वगळता इतर राज्यांमध्ये तसेच ईतर बौद्ध धर्मीय लोकवस्ती असलेल्या देशात आषाढ पौर्णिमा हा दिवस धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून साजरा केला जातो, अशोक विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथे आपल्या ५ लाख अनुयायांसह बौद्ध धम्माची दिक्षा घेतली व त्यासंदर्भात काढण्यात आलेल्या तत्कालीन पत्रकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मचक्र प्रवर्तनाचा समारंभ असा उल्लेख न करता धम्मदीक्षा समारंभ असा उल्लेख केला होता याचाच अर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दि. १४ ऑक्टोबर १९३५ रोजी धर्मांतराची सिंहगर्जना केली होती व त्याप्रमाणे २१ वर्षे विविध धर्मांचा सखोल अभ्यास करून त्यांनी आदरणीय भन्ते चंद्रमणी यांच्या हस्ते प्रथम स्वतः तथागतांच्या बौद्ध धम्माची दिक्षा घेतली व नंतर उपस्थित आपल्या सुमारे ५ लाख अनुयायांकडून स्वतः २२ प्रतिज्ञा वदवून घेऊन त्यांना बौद्ध धम्माची दिक्षा दिली व आपल्या भारत देशातून उत्तर – पूर्व राज्ये वगळता इतर राज्यांतून लुप्त झालेल्या बौद्ध धम्माचे चक्र गतिमान केले. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी अर्थात अशोक विजयादशमी दिनी दिलेल्या धम्मदिक्षेचा दिवस हा धम्मदीक्षा दिन किंवा धम्मचक्र अनुवर्तन दिन असून त्यानंतर साजरा करण्यात येणाऱ्या अशोक विजयादशमी दिनाला धम्मदीक्षा वर्धापन दिन किंवा धम्मचक्र अनुवर्तन वर्धापन दिन असे संबोधणे यथोचित होईल. महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपणास बौद्ध धम्माची दिक्षा देऊन आपल्या गोरगरीब समाज बांधवांवर अनंत उपकार केलेले आहेत. व त्याबद्दल समाज त्यांचा सदैव ऋणी राहील. व धम्मदिक्षेच्या दिवसाचे महत्त्व आपल्या जीवनात अनन्य साधारण असे आहे याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. असे असले तरी धम्मचक्र प्रवर्तन व धम्मचक्र अनुवर्तन किंवा धम्मदीक्षा यामधील असलेला फरक दुर्लक्षित करून चालणार नाही. असे प्रतिपादन केले, त्यानंतर प्रवीण तांबे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला ज्या २२ प्रतिज्ञा दिल्या त्यातील ७ व्या व १० व्या प्रतिज्ञेवर सखोल असे मार्गदर्शन केले, त्यानंतर उपाध्यक्ष राजू धोत्रे, कार्याध्यक्ष संतोष जाधव, सरचिटणीस संदीप मोहिते यांनी देखील बौद्ध धम्मावर मौलिक असे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास विभागाचे उपाध्यक्ष हरीश मोरे, चिटणीस अजय पवार, शाखा अध्यक्ष नरेश मोहिते, राहुल कदम, अनंत मोहिते, काशिनाथ पवार, प्रकाश तांबे, ज्ञानेश्वर सकपाळ, राजाभाऊ शेळके, रामचंद्र पवार, किरण दिलीप जाधव, मिलिंद जाधव, संलग्न सर्व शाखांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात अध्यक्ष राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे उपस्थितांना संबोधित करत असताना गटक्रमांक १३ च्या वतीने सातत्याने जे कार्यक्रम, उपक्रम यशस्वीपणे पार पाडले जातात त्यामागे सर्व शाखा, त्यांचे पदाधिकारी आपल्या मागे खंबीरपणे उभे राहिल्या मुळे आपण सर्व कार्यक्रम, उपक्रम यशस्वीपणे पार पाडत आहोत, आताही ६८ वा धम्मचक्र अनुवर्तन दिन आपण साजरा करत असतानाही सर्व शाखा, त्याचे पदाधिकारी, सभासद, कार्यकर्ते यांचा सिंहाचा वाटा आहे असे प्रतिपादन केले. सरतेशेवटी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानून सरचिटणीस संदीप मोहिते यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

## संभाजी महाविद्यालयात आज पालक व माजी विद्यार्थी मेळावा

मुरुड /महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयात आज दिनांक १५/१०/ २०२४ वार– मंगळवार रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता पालक व माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. या मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व सध्या आळेफाटा पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असलेले अमोल पन्हाळकर तर अध्यक्ष म्हणून समाज जागृती शिक्षण संस्थेचे सचिव मा.ऍड. विजयजी पाटील उपस्थित राहणार आहेत. तसेच समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. बी. एस. (दादा) पटाडे, संस्थेचे संचालक मा. श्री. पंडितराव टेकाळे, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष मा. विकास गाढवे व पालक शिक्षक संघाचे मा. मनोज जोशी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सदरील मेळाव्यास महाविद्यालयातील माजी विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मेळावा यशस्वी करावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक काळम, आयक्युएसी समन्वयक प्रा.एम.बी. गायकवाड, मेळावा समिती प्रमुख प्रा.एन.एल. पैठणकर व सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

# तोंडचिर साठवण तलावामुळे या भागातील शेतकऱ्यांना नवसंजिवनी मिळणार - क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

### आपल्या पुढच्या पिढीला निरोगी आयुष्य जगायचे असेल तर झाडे लावा





उदगीर / प्रतिनिधी :– उदगीर मतदार संघातील शेतकरी हा आर्थिक दृष्ट्या सक्षम झाला पाहिजे म्हणून शेतकऱ्यांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे आपल्या मतदारसंघात अनेक साठवण तलाव मंजूर करून त्याची प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. मतदार संघात कोल्हापुरी बंधारे, गेटेड बंधारे, तिरु नदीवरील बॅरेजेसह छोट्या – छोट्या साठवण तलावांची निर्मिती करून या भागातील शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक उन्नती व्हावी म्हणून प्रयत्न केले असुन आता तोंडचिर साठवण तलावामुळे शेल्हाळ तांडा, शेल्हाळ, तोंडचिर व परिसरातील शेतकऱ्यांना नवसंजिवनी मिळणार असल्याचे मत महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर तालुक्यातील मृद व जलसंधारण विभागांतर्गत मौजे. तोंडचिर साठवण तलाव भुमिपुजन व तोंडचिर गावातील विविध विकास कामांच्या भुमिपुजनाप्रसंगी बोलत होते. यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी अनिल कांबळे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी रंजित नाईक, प्रा.श्याम डावळे, भरत चामले, प्रकाश राठोड, बालाजी भोसले, मनोज चिखले, सुदर्शन पाटील, उदय मुंडकर, राजकुमार बिरादार, मारोती बिरादार, कल्याण बिरादार, रवींद्र काळा, इब्राहिम देवर्जनकर, बालाजी देमगुंडे, प्रमोद काळोजी, इम्तियाज शेख, प्रमोद काळोजी, डॉ.देवेंद्र बिरादार, प्रसाद माना, अरविंद बिरादार, सोमेश्वर पटवारी, ज्ञानेश्वर पाटील, पप्पू गायकवाड, निळकंठ बिरादार, परमेश्वर खटके, सतिश जाधव, राम जाधव आदी उपस्थित होते. पुढे बोलताना नामदार संजय बनसोडे यांनी तोंडचिर साठवण तलावामुळे ३८२ हेक्टर जमिन ओलिताखाली येणार असून यासाठी तब्बल १९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. गेल्या पाच वर्षाच्या कार्य काळात मतदारसंघातील प्रत्येक ग्रामपंचायत ही कोटी मध्ये आहे. शहरासह ग्रामीण भागातील विकास कामांना प्राधान्य देऊन कोट्यावधी रुपयाचा निधी विविध गावांना दिला असून रस्ते, वीज, पाणी व आरोग्याच्या सुविधा ग्रामीण भागातील नागरिकांना पुरविल्या आहेत. आता यापुढील काळात उदगीर शहरात मोठे उद्योग आणून विमनातळाची निर्मिती करणार असून भविष्यात मेडिकल कॉलेज व उदगीर बाबाच्या नावाने वंदे भारत ट्रेन सुरू करणार असल्याचा मानस ना. संजय बनसोडे यांनी बोलून दाखवला. आपल्या पुढच्या पिढीला निरोगी आयुष्य जगायचे असेल तर झाडे लावा. वातावरणात दिवसेंदिवस बदल होत असून झाडांची संख्या कमी होत असल्याने मानवी जीवन धोक्यात येत आहे त्यामुळे सर्वांनी जबाबदारीने वृक्ष लागवड करावी असे आवाहन ना.संजय बनसोडे यांनी करुन लाडक्या बहिणीला भावाची भेट म्हणून 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' ही योजना सुरू करून आपल्या माता भगिनींना प्रत्येक महिन्याला दीड हजार रुपये थेट त्यांच्या खात्यावर जमा केले. या पुढील काळात महायुतीचे सरकार आले तर प्रत्येक महिन्याला तीन हजार रुपये करणार असल्याचे आश्वासन नामदार संजय बनसोडे यांनी दिले. यावेळी शेल्हाळ, तोंडचिर व परिसरातील महिला व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.अंजलीताई घाडगे यांचे गेल्या पाच वर्षात केज विधानसभा मतदारसंघात काय योगदान ? नागरिकांचा सवाल !



केज/प्रतिनिधी :– शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाच्या केज विधानसभेच्या इच्छुक उमेदवार डॉ.अंजलीताई घाडगे यांचे गेल्या पाच वर्षात केज विधानसभा मतदारसंघात काय योगदान ? आहे तसेच डॉ.अंजलीताई घाडगे यांना पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा आमदार संदिप भैया क्षीरसागर यांच्या फोटोची ऍलर्जी आहे का? व पक्षाच्या जिल्हाध्यक्षांना डावलने अंजलीताईंना भविष्यात परवडेल काय? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, डॉ. अंजलीताई घाडगे या सुरुवातीला स्व. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या नेतृत्वाखाली भाजप पक्षाकडून काम करत होत्या व त्या केज विधानसभेची निवडणूक लढण्यास इच्छुक होत्या. स्व. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या निधनानंतर लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली काही दिवस डॉ. अंजलीताई घाडगे यांनी काम कले. व केज विधानसभेच्या उमेदवारीची मागणी केली परंतु त्यांना भाजप पक्षांनी उमेदवारी दिली नाही ऐनवेळी डॉ. अंजलीताई घाडगे यांनी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करून २०१९ ची केज विधानसभेची निवडणूक काँग्रेस पक्षाकडून लढवली होती. त्या निवडणुकी मध्ये डॉ. अंजलीताई घाडगे यांचा पराभव झाला त्यानंतर त्यांनी शिवसेनेमध्ये काही दिवस काम केले परंतु शिवसेना पक्ष फुटी नंतर डॉ. अंजलीताई घाडगे यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश करून शिवसेना शिंदे गटाच्या महिला आघाडीचे जिल्हाप्रमुख पद त्यांना मिळाले होते परंतु. डॉ. अंजलीताई घाडगे यांनी मागील काळामध्ये केज मतदार संघातील शेतकरी,विद्यार्थी, नागरिक व सर्व सामान्याच्या प्रश्नावर कधीच आवाज उठवला नाही तसेच त्या कुठल्याही गावात फिरलेल्या दिसल्या नाहीत व नागरिकांच्या विद्यार्थ्यांच्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शासन स्तरावर कुठले आंदोलन अथवा मोर्चा किंवा कसल्याच प्रकारचे शासन स्तरावर कामाचा पाठपुरावा केला नाही असे नागरिकांतून बोलले जात आहे. परंतु केज विधानसभेची निवडणूक जवळ येताच डॉ. अंजलीताई घाडगे या केज मतदार संघामधील गावांना भेटी देताना दिसत आहेत.डॉ. घाडगे यांनी शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षामध्ये पक्षप्रवेश केला त्यानंतर त्यांनाच पक्षाची उमेदवारी मिळणार असे त्या ठामपणे सांगत आहेत. वेळोवेळी पक्ष बदलणाऱ्या व मागील पाच वर्षात कधीही केज विधानसभा मतदारसंघांमध्ये न फिरणाऱ्या डॉ. अंजलीताई घाडगे यांना पक्षाने उमेदवारी दिली तर त्या निवडून आल्यावर नागरिकांची कामे करतील काय? अशा चर्चा जनतेमधून ऐकण्यास मिळत आहेत. केज शहरांमध्ये या वर्षीचा दसरा मेळावा हा नारायण गडावरच या आशयाचे बॅनर लावण्यात आले आहेत परंतु सदर बॅनरवर राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा आमदार संदीप भैय्या क्षीरसागर यांचा फोटो लावण्यात आला नाही त्यामुळे डॉ. अंजलीताई घाडगे यांना जिल्हाध्यक्षांच्या फोटोचा विसर पडलाय काय? डॉ. अंजलीताई घाडगे यांना जिल्हाध्यक्ष यांची एलर्जी आहे काय? येणाऱ्या काळामध्ये जिल्हा अध्यक्षांना डावलने हे डॉ. अंजलीताई घाडगे यांना परवडेल काय? असे नागरिकांतून बोलले जात आहे. शरद पवार हे राजकारणातील अभ्यासू व मुरब्बी नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे शरद पवार हे पक्षनिष्ठ कार्यकर्त्याला उमेदवारी देतील काय? ऐनवेळी पक्षांमध्ये प्रवेश करणाऱ्या नवख्या कार्यकर्त्यांना उमेदवारी देतील असेही उलट सुलट चर्चा मतदारसंघांमध्ये रंगू लागल्या आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE